॥ चिंतनक्षण ॥

भाग - १ ते १२
एकत्रित आवृत्ती

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

चिंतनक्षण

(भाग - १ ते १२ एकत्रित आवृत्ती)

❐

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

संकलन

डॉ. धनंजय खानोलकर

एम्.डी.

चिंतनक्षण - भाग १ ते १२ एकत्रित आवृत्ती
पुस्तकरूपाने प्रकाशित आवृत्ती दुसरी : जुलै, २०१३
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

चिंतनशक्ती प्रदान करणाऱ्या
भगवंताच्या कृपेला
अत्यंत कृतज्ञ बुद्धीनं
अर्पण....

- सुहास पेठे

चिंतनाचे क्षण

यात संकलित झालेली सूत्रं, ही परमार्थाचं वर्षानुवर्षं चिंतन करताना व अनुभव येत असताना आणि त्याच्या अनुषंगानं सद्यःस्थितीच्या अनेक पैलूंचा विचार करताना, त्या त्या वेळी गवसलेली सूत्रं आहेत. मी ती चिंतनासाठी अनेक वर्षं टिपून ठेवीत आलो आहे. प्रवचन, निरूपण आदींच्या निमित्तानं अनेकदा उत्स्फूर्तपणे आलेल्या उद्‌गारांचाही त्यांत समावेश आहे. काही जिज्ञासू ते टिपून ठेवीत असतात. तसा चिंतनाचा फ्लॅश हा एखाद्या क्षणाचाच असतो म्हणून ते चिंतनाचे क्षण आहेत तर, अनेकदा असंही लक्षात येतं की, त्याआधी घडलेल्या विचारमंथनाचा तो सूत्रमय परिपाकही असतो. हे माझं एक निरंतर चालू असलेलं काम आहे.

पूर्वेतिहास एवढाच की, डॉ. धनंजय खानोलकर निरूपणं ऐकताना अशी वाक्यं टिपून ठेवीत. २००५ मध्ये त्यांनी हँडमेड शीटची काही मोठी पानं सहज दिली. लगेच येणाऱ्या त्यांच्या वाढदिवसाला यांतली काही वचनं बोरूनं लिहून मी त्यांना ती सदिच्छा भेट म्हणून दिली. त्यानंतर तीनच महिन्यांत श्रींच्या इच्छेनुसार संतछाया आकाराला येऊन आम्ही कुटुंबीय त्यांच्याकडं राहायला आलो. त्यानिमित्तानं या वचनांचा पहिला भाग छापून पाडव्याच्या संतछायेतल्या पहिल्या ज्ञानेश्वरीच्या निमित्तानं त्यांनी सर्वांना आपल्या आनंदात सहभागी करून घेतलं. साधकांना त्याची उपयुक्तता वाटून, पुढं त्याचे एकूण बारा भाग त्यांनी संकलित केले. त्याबद्दल डॉ. धनंजय खानोलकर यांचा मी आभारी आहे. या भागांच्या अनेक आवृत्त्याही निघाल्या. आता प्रकाशनाच्या दृष्टीनं हाताळणीची सोय लक्षात घेऊन हे भाग एकत्रित स्वरूपात प्रसिद्ध होत आहेत. ईश्वरी इच्छा असेल तर, अशी पुढली वचनंही प्रसिद्ध होतील, असं वाटतं. या वचनांत अर्थसंकोच, अतिव्याप्ती, पुनरुक्ती अशा संभाव्य त्रुटींबद्दल उदार वाचकांनी क्षमा करावी व उपयोगी ठरेल त्याचा कृपया स्वीकार करावा, ही विनंती.

इथं शनिवारी साप्ताहिक निरूपणं विविध विषयांवर होत असतात. श्रींच्या आज्ञेनुसार चिंतनक्षणाच्या पहिल्या दोन भागांची निरूपणं घडली. कदाचित ही सूत्रं लिहिताना त्यात मला अभिप्रेत अर्थ वा त्याची व्याप्ती काय, ते निदान माझ्यापरीनं स्पष्ट व्हावं, असं श्रींना वाटत असेल. या दोन भागांच्या तीनेक वर्षं चालू असलेल्या निरूपणांचं शब्दांकन मा.श्री. प्रकाश जोशी यांनी प्रयत्नपूर्वक केलं असून, ते आता शक्यतेनुसार प्रसिद्ध होत आहे. या प्रकाशनाशी निगडित सर्वांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे. सर्व संतमंडळी त्याप्रीत्यर्थ निष्ठेच्या नामबुद्धीची त्यांच्यावर कृपा करोत, ही संतांच्या चरणी प्रार्थना.

संतछाया,
सातारा.

- सुहास पेठे

साधना करणे हा, माणसाला मिळालेल्या मर्यादित कर्मस्वातंत्र्याचा, सर्वश्रेष्ठ उपयोग होय.१

नामाचे खरे महत्त्व समजण्यास मानवी जीवनातील अपूर्णत्वाची कल्पना येऊन ते मान्य व्हावयास हवे.२

शरणागती ही अवस्था आहे, काही साधण्याचा मार्ग नव्हे.३

बागेत लावलेल्या रोपाची काळजी घेतो, तेवढी तरी आपल्या साधनेतल्या संकल्पाची काळजी, आपण घ्यायला हवी.४

भक्ताला परिस्थिती अनुकूल-प्रतिकूल नसते तर, ती भगवंताकडे जायला फक्त उपयुक्त असते.५

प्रपंच मोडू नये व परमार्थ सोडू नये, हा आपला मध्यम मार्ग आहे.६

कर्तृत्वाने हरला आणि ते माणसाला कळले म्हणजे भगवंताची कृपाच झाली म्हणायचे.७

साधना म्हणजे अनेक अडथळ्यांची सात्त्विक शर्यतच आहे.८

वैज्ञानिक दृष्टिकोनाने परमेश्वर जास्तीच सिद्ध झाला आहे.९

कामनेचा भक्त असणे
गैर नाही, पुढे भगवंताचा भक्त न होणे
गैर आहे.१०

नामाच्या चिंतनाची सहा अंगे - अर्थ,
शक्ती, स्थान,
संबंध, प्रयोग, अनुभव.११

परमार्थाचे नुकसान जेवढे मनाने केले,
तेवढे शरीराने कधीच केले नाही.१२

शब्दशक्तीचा यथायोग्य वापर म्हणजे मौन.१३

नामापेक्षा काही मोठे, हवेसे वा करावेसे वाटणे हे वृत्ती गुंतण्याचे लक्षण समजून सावध राहावे.१४

परमार्थात नित्यशरण तो खरा शरण.१५

व्यवसाय वा नोकरी हे चरितार्थाचे साधन असावे, जीवनाचे ध्येय असू नये.१६

सत्पुरुषांचे सर्वांवर व सारखेच प्रेम असते, हे कळायला आणि पचवायला -सुद्धा, मोठ्या साधनेची गरज आहे.१७

परमार्थात दंभ आला की तो प्रपंचच झाला.१८

परमार्थात प्रगतीसाठी दोन गोष्टी आवश्यक - प्रयोग व प्रतीक्षा.१९

ज्यांना म्हातारपण ही संधी वाटते, त्यांनी तरुणपण योग्य तऱ्हेने घालविले आहे.२०

साधना म्हणजे हरण्याचा अभ्यास होय.२१

नाम हे साधन नसून साध्य आहे, असे अनुभवाला येईपर्यंत नाम घ्यावे.२२

एखादी गोष्ट अनुकरणातून करणे आणि प्रेरणा घेऊन करणे यांतला फरक ओळखण्यास आपण शिकले पाहिजे.२३

शुद्ध विचारानेसुद्धा चित्तास प्रसन्न वाटते, तर ते विचार अंमलात आल्यास काय होईल ? २४

अपमान ही साधकाची परीक्षा आहे, पण मान ही त्याची त्याहून कठीण परीक्षा आहे.[२५]

प्रार्थना हे नि:शस्त्राच्या हातातले शस्त्र आहे.[२६]

अध्यात्मात 'नवीन' काही होण्याची शक्यता नाही.[२७]

भगवंतप्राप्तीच्या आपल्या ध्येयाला अनुकूल असे जीवन घडवणे म्हणजेच साधना करणे होय.२८

श्री महाराजांच्या माणसाला खरी लक्ष्मी ही 'नामलक्ष्मी'च होय.२९

घरी हरी तो कशास वणवण करी ?३०

वृत्तीतले परिवर्तन हा साधनेचा पुरावा आहे.[३१]

देवाबद्दलची कल्पना
विशुद्ध होत जाणे, हे
खऱ्या साधनाचे लक्षण आहे.[३२]

अर्जुनासारखी आपली
स्थिती असेल तर
गीता अधिक कळते.[३३]

सुप्ताला प्रश्न नसतात, जागृताला असतात.३४

सध्याच्या मनाचे सर्व ऐकत जाण्यात देहाच्या दास्यत्वाचा धोका आहे.३५

मला समजते त्याच्यापलीकडे ज्ञान आहे, असे ज्याला वाटते,
तो श्रद्धावान.३६

प्रगतीसाठी परमार्थात केलेला प्रयत्न कधीही वाया जात नाही.३७

प्रपंचाची तीन प्रमुख वैशिष्ट्ये -मिश्रण, बदल, भ्रम.३८

परमार्थातल्या परीक्षा नकळत होत असतात.३९

कर्म करण्यापूर्वी,करताना आणि नंतर माझ्या वृत्तीवर काय परिणाम झाला, हे कर्मफलापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे.४०

इंद्रियांना स्थान असावे, पण मान नको.४१

विवेक कळतो, पण तो प्रत्यक्षात आणण्यासाठी जी शक्ती लागते, ती म्हणजे वैराग्य.४२

समाधानी होण्यासाठी ज्ञानी व्हावे किंवा श्रद्धावान तरी.४३

जो घटनेच्या पलीकडे जाऊन विचार करतो, तो परमार्थी.४४

संशय ही आपल्या पायात आपणच घातलेली बेडी आहे.४५

गुरूंच्या इच्छेने आपण परमार्थ केला म्हणजे आपल्या कल्याणाचा प्रपंच भगवंताला करावा लागतो.४६

ज्याचा आनंद मार्गी लागला आहे, त्याचेच खरे मार्गी लागले आहे.४७

अनेक कर्मे करता करता अनुभवीपणाचा लेप चित्ताला लागतो, त्याने अहंकार वाढतो.४८

साधनेनंतर मी किती चांगला आहे, असे वाटू लागले तर आपले काही खरे नाही, हे ओळखावे.४९

मनाचा हात सोडल्याखेरीज आनंद नाही.५०

अशांततेच्या प्रसंगांकडे, शिकण्याची संधी म्हणून पहावे.५१

आपल्या खऱ्या स्वभावाचे दर्शन घडणे हा कर्माचा महत्त्वाचा उपयोग आहे.५२

दुसऱ्याच्या हिताचा विचार व कृती ही रामचिंतनाची सुरुवात आहे.५३

प्रपंचाच्या धंद्याचा खरा फायदा समाधानात मोजावा.५४

जो घरात असतो, पण मीपणाने नसतो तो सर्वांना आवडतो.५५

'मी व माझे' सोडायची आपली किती तयारी आहे, त्यावर सत्यदर्शन अवलंबून आहे. ५६

माझ्या विपरीत कल्पनाच अनेकदा माझ्या प्रगतीच्या आड येतात, म्हणून गुरुआज्ञापालन महत्त्वाचे.५७

सत्याचे ज्ञान व स्वीकार जेथे आहे, तो ब्राह्मण.५८

सावधानता नसल्याने चिंतनशक्ती वाया जाते.५९

रामाच्या मार्गाने आत्माराम गाठणे हा सामान्यांच्या हिताचा मार्ग आहे.६०

आपले जीवन संतांच्या उपदेशाप्रमाणे घडवणे, ही संतांची खरी सेवा होय.६१

निःस्वार्थीपणे व हितबुद्धीने दुसऱ्याशी वागणे म्हणजे त्याच्यावर प्रेम करणे होय.६२

साधना एक वेळ कमी केलेली परवडली, पण साधनेचा अभिनय करण्याची बुद्धी होऊ नये.६३

बुद्धीशिवाय पुढे जाता येत नाही, पण ती फार पुढेही जाऊ देत नाही, कारण तिच्याबरोबर अहंकार असतो.६४

इतरांचे गुण पाहाणे आणि नावाजणे हे औदार्य आहे.६५

एकान्त आपल्याला कोठेही जपता येतो.६६

कार्यकारणभाव गूढ असतो, हे समजून घेतल्यास चित्ताच्या अशांततेचे प्रमाण कमी होईल.६७

घटना घडतच राहातात पण त्यांचे ओझे वागवणे नको.६८

देहाशी तादात्म्य कमी कमी होत गेले तर मनुष्य खऱ्या अर्थाने परिपक्व होईल.६९

प्रारब्धाने आलेले सर्व आनंदाने स्वीकारणे म्हणजेही वैराग्यच.७०

आपण दुसऱ्यांची काळजी घेतल्यास आपली काळजी ते तरी घेतात नाहीतर भगवंत तरी.७१

सत्कर्म फक्त परमार्थाची संधी उपलब्ध करून देईल, परमार्थात पुढे नेत नाही.७२

माझ्यात देवपण आहे -ही वस्तुस्थिती कळणे अवघड, टिकवणे अवघड व व्यवहारात आणणे त्याहीपेक्षा अवघड - म्हणून 'भक्ती बरी'.७३

क्षमाशीलतेला मोठ्यात मोठे व कर्तृत्वाच्या अहंभावाला लहानात लहान मन बाळगू शकणाऱ्याला शांती दूर नाही.७४

लौकिकातले शौर्य शस्त्रे घेऊन लढण्यात आहे, परमार्थातले शौर्य शस्त्रे टाकून लढण्यात आहे.७५

कर्माकडे वृत्ती तपासण्याची संधी म्हणून पहावे.७६

देव म्हणून आपण जी कल्पना करतो त्यात व त्याच्यापलीकडे राहतो तो देव.७७

व्यवहारातील घटनांचे मी का,कसे व किती चिंतन करावे, हे खरोखर शिकले पाहिजे.७८

रामचिंतन होत नाही तोवर साधक म्हणवून घेऊ नये, हे बरे.७९

शांततेच्या गाभाऱ्याचे सहनशीलता हे एक द्वार आहे.८०

हवेपण हा अग्नी आहे, तो समाधान जाळल्याशिवाय राहात नाही.८१

आपल्या अनेक आसक्ती कर्तव्यांचे रूप धारण करून आपला घात करतात.८२

नम्रतेत आपल्या गुणांची रास्त जाणीव,अवगुणांची तीव्र खंत, याबरोबरच दुसऱ्यांच्या गुणांची तीव्र जाणीव व त्यांच्या अवगुणांबद्दल औदार्य अंतर्भूत आहे.८३

आपले फक्त वाढणे असते. खरे जगणे आनंदाचे असते. तसे जगणाऱ्याचा वाढदिवस करणे उचित.८४

आपले लघुत्व लक्षात आले तर गुरुत्वाचा अर्थ, व्याप्ती व महत्त्व लक्षात येईल.८५

नियंत्रित चिंतन कमी म्हणून आपले अनियंत्रित चिंतन जास्त होते.८६

आपले अनियंत्रित चिंतन गुरूविना थांबणार नाही.८७

देहाचे दुःख संपायला कदाचित मृत्यूपर्यंत थांबावे लागेल, पण मनाचे दुःख संपवायचे ठरवले तर आजही संपेल.८८

परमार्थात आपण जे मागतो त्यामागे आपला खरा भाव नसतो म्हणून ते मिळत नाही.८९

आजवरच्या आयुष्याचे फोलपण लक्षात येणे, ही पुण्याची पहाट आहे.९०

जगलेली वर्षे बहुतेकांच्या जमेला असतात. पण त्यात आलेले अनुभव आणि त्यानुसार सर्वोच्च ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक प्रयत्न व परिवर्तन किती लोकांच्या जमेला असते ?९१

गुरूंच्या एखाद्या वाक्याचा अर्थ कळायला अनेक वर्षे जातात. आचरण किती दूर असेल ?९२

देहापेक्षा काही महत्त्वाचे व मोठे ध्येय माणसाला सापडले म्हणजे मग मृत्यूचे भय उरत नाही.९३

माझ्याकडे दृश्याच्या पलीकडे जायचे सामर्थ्य आहे, पण मला त्याची कल्पनाही नाही व खात्रीही नाही. हा माझ्या प्रगतीतला पहिला व मोठा अडथळा आहे.९४

मला सारखे कुणीतरी 'व्हायचे' असल्यामुळे, मी कोण 'आहे', याकडे लक्ष देण्यास सवडच मिळत नाही. वस्तुतः मी कोण 'आहे', याकडे लक्ष देणे खरे गरजेचे आहे - मी कुणी 'होण्या'साठीही, खरे तर मी कुणी व्हायची आवश्यकता नाही, हे कळण्यासाठीही आणि खऱ्या आनंदाच्या प्राप्तीसाठीही !९५

मी जे काही करतो त्यात आनंद टिकत नसेल तर, मार्ग चुकतो, असे समजावे.९६

आपल्याला आपल्या तात्कालिक हिताची चिंता पडलेली असते, गुरूंना आपल्या अंतिम हिताची चिंता पडलेली असते. त्यामुळे आपली गुरूंना चिंताच नाही असे अनेकांना वाटते.९७

प्रापंचिक म्हणतो मी हळूहळू सारे गोळा करून सुखी होईन, पारमार्थिक म्हणतो मी हळूहळू सगळे टाकून सुखी होईन.९८

सद्गुरूंचे खरे म्हणणे ओळखण्यासाठी सावधानता व परिपक्वता यांची आवश्यकता असते.९९

आपल्याला खरी भूक कशाची आहे हे वय वाढले तरी माणसाला कळत नाही. म्हणून त्या अर्थाने त्याचे बालपण काही सरता सरत नाही.१००

देहात बुडून राहून देव गाठतो म्हणणे म्हणजे घरात राहून गावाला जाईन म्हणण्यासारखे आहे.१०१

भगवंत भक्ताच्या गरजा भागवतो, अपेक्षा नव्हे.१०२

निसर्ग इतर विकास स्वतः समानपणे घडवून आणतो, फक्त माणसाच्या अंतर्जीवनाचा विकास त्याने विश्वासाने व कौतुकाने माणसावर सोपवला आहे.१०३

आपल्या आंतरिक शुद्धीकरणाला व परिवर्तनाला आवश्यक तेवढीच कर्मे करण्यात कौशल्य आहे. अन्यथा कर्मांत अडकायला होते.१०४

स्वतःची अपूर्णता जाणवणे, मान्य करणे व पूर्णतेची गरज वाटणे - हा भक्तीचा पहिला टप्पा आहे.१०५

जीवदशेत माणूस सर्वांगाने जीव असतो,तसे भक्तिदशेत माणूस सर्वांगाने भक्त असणे आवश्यक आहे.१०६

तंबोरा, गायकाला त्याच्या गाण्याच्या आधारभूत मूळ स्वराचे-पट्टीचे, सदैव भान देत असतो. तसे जगताना नाम आपल्याला सदैव आपण कुणाचे आहोत - त्या मूळ स्वरूपाचे भान देत असते.१०७

जे देवाने दिले आहे त्या सर्वाबद्दल जाणीव टिकत नाही,म्हणून दु:ख आहे.१०८

नाम घेणे एक वेळ सोपे आहे, पण एरवीच्या काळात नामाला पूरक कर्मे करीत राहाणे कठीण आहे.१०९

दुःख असणे ही वेगळी गोष्ट आहे व दुःखाची सवय होणे ही वेगळी गोष्ट आहे. पहिल्यात वस्तुस्थिती असेल पण दुसऱ्यात धोका आहे.११०

जग चुकते आहे असे म्हणून बरोबर असण्याची माझी जबाबदारी मी टाळू शकत नाही.१११

संतांनी जगावर अनेक उपकार केले आहेत. त्यांतल्या त्यात ते आपल्याबरोबर राहिले व आपल्याशी बोलले, हे त्यांचे दोन अविस्मरणीय उपकार आहेत.११२

भगवंताच्या सेवेतील पंचमहाभूते सामान्य जिवाला उद्धारासाठी मार्ग मिळावा म्हणून देहरूपाने जिवाच्या सेवेत राबतात, हे जिवावर केवढे उपकार आहेत !११३

सामान्य माणसांनी आपल्या दुःखाच्या सबबी पुढे करून साधना टाळू नये, म्हणून बहुधा परमेश्वराने सर्व प्रकारची दुःखे, संतांना त्यांच्या आयुष्यात सोसायला दिली आहेत.११४

समजून न घेतल्यास सुधारणेची संधीच नाही.११५

ज्यांना गुरूंच्या प्रेमळ, निःस्वार्थ, विनामूल्य सांगण्याची किंमत ओळखता येत नाही, त्यांना त्यांच्या प्रगतीसाठी मग आपल्या आयुष्याची व स्वानुभवाची जबर किंमत मोजावी लागते.११६

अंतकाळच्या स्मरणाच्या प्रकाशात जो जीवनाचा ग्रंथ वाचील, त्याला तो अधिक कळेल.११७

माणुसकीची परीक्षा पास व्हायचे , तर कृतज्ञतेचा अभ्यास करावाच लागतो.११८

देह सोडा आणि देव घ्या - असा परमार्थाचा कळायला सोपा व आचरायला अवघड मार्ग आहे.११९

देवाला आपल्याकडून कोणत्या अपेक्षा आहेत हे जाणून घेण्यासाठी अधूनमधून देवदर्शनाला जात असावे.१२०

परिस्थितीवर प्रतिक्रिया देण्यात अडकल्यामुळे परिस्थितीतून शिकण्याचे राहून जाते. १२१

अकारण तुलना,अनावश्यक दंभ, अतिरिक्त संचय,अनाठायी टीका, घातक मत्सर - ही सारी बेसावधतेची अपत्ये आहेत.१२२

योग्य एवढेच कर्तव्य
करायचे ठरवले,तर नामाला
आजच्यापेक्षा निदान दुप्पट
वेळ मिळेल.१२३

लीला ही सद्‌गुरूंनी शिष्यांना शिकण्यासाठी हेतुतः दिलेली संधी आहे.१२४

भगवंताचे स्वरूप अत्यंत रहस्यमय असले तरी तो दयाळू असल्याने आपल्या प्रिय लेकरांसाठी त्याने आपले स्वरूप निसर्गात व्यक्त करून ठेवले आहे.१२५

खरी कृतज्ञता एका पारड्यात व इतर कुठला सद्‌गुण दुसऱ्या पारड्यात टाकला, तर कृतज्ञतेचे पारडे जड राहील.१२६

जगात चमत्कार नसतात, पण आपल्याला न कळणाऱ्या गोष्टी असतात.१२७

मौनदेवाच्या खऱ्या उपासकाला जरुरीपुरते व गुरुकृपेने बोलणेसुद्धा अलंकारासारखे शोभून दिसते.१२८

परमार्थात यशच यश कारण यशात प्रगती व अपयशात शरणागती !१२९

जग पाहाणे वेगळे, जग कळणे वेगळे. ज्याला कळते त्याला ते फारसे पाहावे लागत नाही.१३०

अहंकार व पैसा हे ज्याला डावेउजवे विश्वासू साथीदार वाटतात त्याला असमाधान अटळ आहे. १३१

भगवंताची कृपा असीम असते, तिला आपल्या कल्पनांचे व विचारांचे बंधारे घालू नयेत. १३२

आधी देवाच्या स्मरणास गरज म्हणून 'उपासनेचे उपक्रम' सुरू होतात, नंतर अनवधानाने 'उपक्रमांची उपासना' सुरू राहाते.१३३

वयाबरोबर आकलनाऐवजी अहंकारच वाढतो, ही माणसाची शोकांतिका आहे. १३४

माझ्या खऱ्या अस्तित्वाला मृत्यू हात लावू शकत नाही.१३५

देवाकडून काही मिळवायचे राहिले नाही, म्हणजे खऱ्या भक्तीची वाटचाल सुरू झाली.१३६

परिस्थिती म्हणजे आपल्या कर्मांचा परिणाम व शिकण्याची संधी असताना, परिस्थितीबद्दल तक्रार करणे म्हणजे बेसावधपणा व नुकसान आहे.१३७

आकलन, नम्रता व परिपक्वता यांची वाढ - या सुशिक्षितपणाच्या कसोट्या आहेत. १३८

माझ्या प्रतिमेला धक्का म्हणजे, मला धक्का नव्हे, हे लक्षात आले तर, बऱ्याच काळज्या, दंभ आणि संघर्ष कमी होतील.१३९

आत्मदर्शनाच्या आरशात पाहिल्यावर अस्वस्थता येणे, ही आत्मदर्शनाची पहिली पायरी आहे.१४०

आपले जीवन वजा आपले कळत नकळत स्वार्थ बरोबर शून्य, ही दुर्दैवी वस्तुस्थितीच अनेकांच्या लक्षात येत नाही.१४१

नामात एकाग्रता होत नाही, गोडी वाटत नाही म्हणणे म्हणजे शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विशेष गुणवत्तेच्या प्रमाणपत्राची अपेक्षा करण्यासारखे आहे. १४२

ज्या मनाचे आपण ऐकतो आहोत त्याची अवस्था, त्याचे ऐकावे अशी आहे का, हे आधी पहावे. १४३

आपल्या कर्मांच्या मागे इच्छा -वासना तर गुरूंच्या लीलेमागे केवळ हितबुद्धी असते. १४४

विज्ञान पंचेन्द्रियांचे लाड करण्यात गुंतले आहे आणि आम्ही त्या विज्ञानाचे कौतुक करण्यात गुंतलो आहोत, सावधता दोघांनाही गरजेची आहे. १४५

सद्गुरू आपल्या अंतरंगाचे व्यवस्थापन करणे जाणतात, शिकवतात व करवून घेतात.१४६

आपल्याला जे चांगले शिकायला मिळते त्याचा निकृष्ट उपयोग म्हणजे ते अंमलात न आणता हौसेने दुसऱ्यांना सांगत सुटणे ! १४७

संतचरित्रांतून आपली परिस्थिती, कुवत व सर्वोच्च मानवी ध्येय यांची यशस्वी सांगड कशी घालावी, हे समजते.१४८

स्वतःवरचे आत्यंतिक प्रेम ही माझ्या अस्वास्थ्याची मीच केलेली तरतूद आहे.१४९

स्वतःच्या उद्धाराचा कमी होत चाललेला वेळ, हीच जगातली खरी काळजी करण्यासारखी गोष्ट आहे.१५०

आपल्या मनाचे लाडावलेल्या
मुलासारखे झाले आहे.त्यामुळे
कल्याणाचे होण्यापेक्षा मनासारखे
होण्याचीच चिंता जास्त लागते.१५१

'मी गुरूंचा आहे'याचा सार्थ अभिमान
मला वाटण्याबरोबर त्यांनाही वाटावा,
यात साधनेचे मर्म आहे.१५२

अहंकाराच्या त्याज्य लोढण्याला अनेक
लोक उपयुक्त व गरजेचे शस्त्र
समजतात ! १५३

मनाच्या ताब्यात राहणे, आपल्याला वाटते एवढे, अपरिहार्य नाही.१५४

वर्तमानाची प्रगतीला असलेली अनुकूलता लक्षात न येण्याने अपरिमित हानी होते.१५५

अनेक माणसे जगात न राहता स्वत:च्या जगात राहतात व आपलेच नुकसान करून घेतात.१५६

परिस्थिती आटोक्याबाहेर गेलेली उत्तम रीतीने पाहाता येणे हा, ती आटोक्यात आणण्याचा पहिला मार्ग आहे.१५७

मी बरोबर असतानाही मला समर्थनाची गरज वाटते तेव्हा, मी बहुधा बरोबर नसतो.१५८

दंभाचा प्रयत्नपूर्वक त्याग करणे ही मन:स्वास्थ्यावरची कडू, पण गुणकारी गोळी आहे.१५९

स्वार्थाच्या प्रेरणेला सावध राहावे लागत नाही, नि:स्वार्थी व्हायला मात्र सावध राहावे लागते.१६०

मत्सराचे दास्यत्व व त्यामुळे येणारे दु:ख नाहीसे व्हायला दुसऱ्यांविषयी सातत्याने शुभेच्छा बाळगणे, ही सोपी सुरुवात आहे.१६१

प्रपंचातल्या खऱ्या अडचणींचीसुद्धा जे साधनेसाठी सबब करीत नाहीत त्यांच्या साधनेतल्याच काय, प्रपंचातल्या अडचणीसुद्धा भगवंत काही सबब करून सोडवतो.१६२

ज्या डोळ्यांना दृश्य जगच पाहायचे असते त्यांना आरसा, गुरू, देव यांची फारशी गरज वाटत नाही. ज्या डोळ्यांना स्वतःला पाहायचे असते, त्यांना मात्र या गरजा असतात.१६३

लोकांना स्थूलातले पुरावे लागतात, म्हणून ज्याचे पुरावे सूक्ष्म असतात त्याचे ते देता येत नाहीत.१६४

मला काय मिळाले आहे याची कल्पना आल्यास, कल्याणासाठी त्याचे काय करावे हे पुढे शिकता येईल. १६५

कर्मात व आपल्यात ज्याला सदैव आवश्यक अंतर राखता आले, त्याने साधले. १६६

आपले सर्व कौशल्य प्रपंचाच्या कामी लागले आहे म्हणून परमार्थात अपयशांचा सुकाळ होतो.१६७

प्रतिमा मोडण्याचे धैर्य दाखवले तर स्वरूप व आनंदाइतके जवळचे काही नाही.१६८

परमार्थातला प्रपंच जिंकता येणे - हे, नुसता प्रपंच जिंकण्यापेक्षा कठीण व जरुरीचे आहे.१६९

प्रगतीसाठी स्वत:च्या दोषांचे आकलन लागते, चिंतन नव्हे.१७०

सत्संग हाच परमार्थाचे रोप, पाणी व प्रकाश आहे.१७१

प्रयत्न करूनही प्रयत्नांचा आधार न वाटणे, ही प्रयत्नवाद व शरणागतीची सात्त्विक सांगड आहे. १७२

प्रामाणिकपणे पोटासाठी कष्टावे, निष्कामपणे सेवेसाठी कष्टावे आणि मग मात्र वेळ काढून भगवंतासाठी 'स्व'स्थ असावे. १७३

असार ते धरून ठेवण्यानेच संघर्ष व दुःखे वाट्याला येतात.१७४

संत हे भगवंताचे माणसाला कळणारे एक स्वरूप होय.१७५

ऐहिकात, ऐहिकाच्या पलीकडे जाण्याची जी क्षमता आहे, तेच ऐहिकातले सुवर्ण आहे.१७६

न जमणाऱ्या साधनप्रकाराचा आग्रह व खंत - हे साधनेतले स्वनिर्मित अडथळे आहेत.१७७

वाटेवरच्या थांब्यांना, मुक्कामाच्या जागा समजण्याने, भगवंताची प्राप्ती लांबते.१७८

जे दिसते ते दाखवायला डोळे व सूर्य पुरतात.पण जे दिसत नाही किंवा दिसूही शकत नाही, ते दाखवायला मात्र गुरू लागतो.१७९

'साद'नाही म्हणून 'प्रसाद' नाही.१८०

सर्वसाधारण मानवी क्षमता व कार्ये यांच्या उत्तमात उत्तम संतुलित व्यवस्थापनाचे शास्त्र म्हणजे भक्ती होय.१८१

संतांनी भगवंताची प्राप्ती कशी करून घेतली हे त्यांच्या चरित्रांतून कळले,तरी आपण ती कशी करून घ्यावी, हे त्यांच्या उपदेशातून कळते.१८२

उन्नतीने समाधान होत नाही, याचे कारण उन्नतीचे प्रयत्न चुकीचे नसून उन्नतीविषयीच्या कल्पना चुकीच्या असतात, हे आहे. १८३

परमार्थाच्या कुलुपाच्या अनेक किल्ल्या आहेत,पण सर्व किल्ल्यांतली अडचण एकच आहे की, कुठलीही किल्ली प्रत्यक्ष वापरल्याशिवाय कुलूप उघडत नाही.१८४

नाम हा शब्द किंवा संकेत न वाटता भगवंतच वाटू लागला म्हणजे आपली नामातली प्रगती झाली म्हणायचे. १८५

आजार, अपयश, मनाविरुद्ध गोष्ट - ही स्वत:पुरती तरी आपला अहंकार ओलांडण्याची एक परीने अनायासे आलेली संधी होय.१८६

खऱ्या आनंदाची कल्पना नाही तोपर्यंतच करमणुकी, मनोरंजने व कृत्रिम आनंदाची चलती आहे.१८७

गरजा बेसावधपणे व अकारण वाढवण्यात आपण भगवंतापासून दूर जाण्याचे बीज व धोका आहे.१८८

अनेक महान ग्रंथ व संत यांचे बरेचसे श्रम, आपल्याला खरा श्रोता बनवण्यात खर्ची पडलेले आहेत. १८९

सध्या कुरुक्षेत्रे सोडून अन्य सर्वत्र गीतेचा सुकाळ आहे.१९०

आपले तोंड देवाकडे नसले म्हणजे देवाचे तोंड कुठे करावे अशा गोष्टींची चिंता जरा जास्त लागते.१९१

संतांचे सर्वांवरच प्रेम असले तरी दोन लोकांच्यावर त्यांचे विशेष प्रेम दिसते- एक त्यांचे 'अंतर' जाणणारे व दुसरे त्यांच्यापासूनचे आपले 'अंतर' जाणणारे ! १९२

स्वार्थ व अहंकार यांनी कळतनकळत प्रतिक्षणी होणाऱ्या अशुद्धीचे प्रायश्चित्त ही आपली किमान दैनंदिन उपासना होय.१९३

उघड्या, अनुत्सुक व नापीक माळाला कुंपणाची व राखणीची गरज नसते, म्हणून काहींना गुरूंचा सहवास वा रक्षण नसते.१९४

अपरिमित स्वार्थाच्या तत्त्वज्ञानाने माणुसकीचा दुष्काळ आणला आहे.१९५

भगवंताची वा सद्गुरूंची लीला म्हणजे आपल्या लक्षात येईपर्यंत सांगत राहाण्याची व्यवस्था नव्हे, ती सावधांसाठी सूचकतेची चमकून जाणारी वीज आहे.१९६

भगवंत सर्वव्यापी असूनही माणूस भगवंतापासून अलग राहू शकतो, याचे भगवंतालाच आश्चर्य,जिज्ञासा व दुःख आहे.१९७

अनेक लोक 'देवळांना' जातात,
काहीच 'देवांना'!१९८

एकंदरीत माणसाला 'स्व'शिवाय त्राता नाही - प्रपंचात स्व 'गिरवल्याशिवाय' नाही व परमार्थात स्व 'पुसल्याशिवाय' नाही ! १९९

मृत्यू म्हणजे मुक्ती नव्हे ! २००

ज्यांना सहीपुरते लिहिणेही कठीण जाते अशी नवी निरक्षर पिढी संगणककृपेमुळे आकाराला येण्यातला धोका वेळीच ओळखण्यासारखा आहे. २०१

अनेक जण अनुग्रहानंतर साधनेला लागतात ! खरे तर, खऱ्या अनुग्रहासाठी खडतर साधनेची गरज आहे.२०२

जीवनाच्या उच्चतम अवस्थेत नित्य राहाता यावे म्हणून करायची तयारी म्हणजे साधना होय.२०३

वेदनांच्या घंटा वाजत असल्या म्हणजेच काहींच्या देहातला देव जागा राहातो ! २०४

आपले प्रपंचाचे तथाकथित भरलेले ताट न हालवता त्याभोवती परमार्थदृष्टीची सुंदर रांगोळी काढून आनंदीआनंद निर्माण करणारे श्री गुरू किती दयाळू असतील !२०५

आचरणावरून गुरूंचे नाव न कळल्याने ते सांगण्याची वेळ येणे, शिष्यत्वाला कमीपणाचे वाटावे.२०६

माणसाला स्वार्थाला आयुष्यभर वकील लागत नाही व परमार्थात मात्र गुरूशिवाय एक पाऊल पुढे पडत नाही ही वस्तुस्थिती की सबब ?२०७

जागी बसून मार्गावरच्या शंका विचारण्यापेक्षा, चालताचालता येणाऱ्या शंका विचारणे बरे !२०८

लोभ व संचयाविरुद्धच्या लढाईत, आपले दान स्वीकारणारा हा, आपला 'कृतिशील मित्र' आहे.२०९

कळते ते वळावे म्हणून कमी पडणारी शक्ती मिळवणे, म्हणजे उपासना होय.२१०

प्रयत्नांची पराकाष्ठा, शरणागतीची परिसीमा व भावांची परिपूर्णता यांचा संतांकडे त्रिवेणीसंगम असतो, म्हणून भाविक साध्या स्नानानेही शांत-पवित्र होतो.२११

आपत्ती सर्वांना असतातच,पण त्यांचा त्रास न मानण्याची क्षमता आपल्यात असते, याची कल्पना मात्र सर्वांना असतेच असे नाही.२१२

आपल्या आरशाचा पारा उडाला नसला, तर आपल्या दुःखाचे कारण आपण स्वतः दिसतो, उडाला असला तर कारण जग दिसते.२१३

नाम पोटात ठेवून प्रसंगाला सामोरे जावे.२१४

खऱ्या परमार्थाचे स्वरूप, कौशल्य व थोडा अनुभव देऊ शकला तर तो 'सत्संग' खरा, बाकी परमार्थाच्या नावावर स्नेहसंमेलन ! २१५

कर्म 'एक'च असले तरी भावनेची कितीही अर्थपूर्ण 'शून्ये' त्याच्यापुढे ठेवता येतात, म्हणून तुळशीपत्रानेही भगवंत वश होतो. २१६

आसक्ती कमी होत जाणे, व्यवहारातील कुठलीच घटना स्वतः संवेदनक्षम असूनही मनात खोलवर न जाणे व साधनेचे सातत्य टिकून राहाणे - या नाम बरोबर चालल्याच्या खुणा आहेत.२१७

मनाला नावडणाऱ्या वस्तू पुरवणे व आवडणाऱ्या टाळणे हा प्रापंचिकांचा सोपा योगमार्ग आहे.२१८

काहीच उच्च ध्येय नसेल तर निदान देह सात्त्विक कष्टांत तरी ठेवावा.२१९

आपत्तींपूर्वी असलेल्या व आपत्तींबरोबर आलेल्या गोष्टी पाहिल्या की, अनेकदा आपत्तींबद्दल तक्रार राहात नाही.२२०

उपक्रमांना अनेक पर्याय असू शकतात, उपासनेला नव्हे ! २२१

पैसा, सत्ता, रूप यांचा अहंकार व्ययाने, क्षयाने, वयाने तरी जाईल, पण सत्कर्मांचा अहंकार जाणे कठीणच !२२२

मौनातदेखील ज्यांना स्वत:शीसुद्धा न बोलता राहाता येते ते खरे मौनी !२२३

चित्ताचे वय सांगता आले नाही, तरी घटक सांगता येतात आणि चित्ताचा पालटही करता येतो.२२४

प्रपंचातल्या आपल्या सुखदु:खात 'साक्षीदार'खूप मिळतात, पण सद्गुरूंसारखे 'प्रेमळ साथीदार' मात्र कमीच भेटतात ! २२५

डोळ्यांना दिसते ते खरे नसू शकते, हा जर आपला प्रपंचातला अनुभव आहे तर, जे खरे आहे, ते डोळ्यांना न दिसू शकते - हे संतांचे म्हणणे समजून घेण्यात, कोणती अडचण आहे ? २२६

प्रपंच करण्यासाठी 'इहा'ला पर्याय नाही, तसाच आनंदासाठी 'परा'ला पर्याय नाही.२२७

'इह' समजून, सांभाळून, पुरवून, संपवून मोकळे व्हावे - मोडून, टाकून, टाळून, पळून - नको.२२८

संत हे आपली दृष्टी बदलण्यासाठी आहेत, सृष्टी बदलण्यासाठी नाहीत, दृष्टी बदलल्याने पुढे आपल्याच कर्माने सृष्टी बदलते.२२९

वस्तुस्थितीचा विसर पडणे व विसर पडल्याची जाणीवही न उरणे ही माया.२३०

'संचयात्मा'नुसता स्वतः दुःखात पडत नाही, तर इतरांनाही दुःखात टाकतो.२३१

संपर्कासाठी मोबाईलची दोरी गळ्यात अडकवणे आधुनिक व सुशिक्षित लोकांना अडचणीचे वाटत नसेल तर भक्ताला स्मरणासाठी गळ्यात माळ घालण्यात संकोचायचे काहीच कारण नाही.२३२

मृत्यूच्या विस्मरणात जीवन जगणे म्हणजे अंधारात ग्रंथवाचन करणे आहे.२३३

सावधतेने वर्तमानाची छिन्नीहातोडा चालवणाऱ्याला भूतकाळाच्या आठवणींच्या व भविष्यकाळाच्या कल्पनांच्या सारखळ्या बांधू शकत नाहीत व बाधूही शकत नाहीत.२३४

भूतकाळ कसाही असू दे, पण आजच्या दुर्लभ, सुंदर व आदर्श वर्तमानात मी तो का जगावा ?२३५

काळाचा फरक पडला म्हणजे बाह्य प्रश्नांत फरक पडतो, आंतरिक प्रश्नांत नव्हे.२३६

प्रपंच ही अशी परीक्षा आहे जिच्यात उत्तीर्णांचे प्रमाणच मुळात फार थोडे असते.पण, परीक्षेला बसणाऱ्या प्रत्येकाला मात्र मी पहिला आलो आहे, असे वाटते.२३७

उपासना म्हणजे वेळेला सर्व विधायक कामी उपयोगाला येणारी शक्ती आहे, फक्त उपयोगाच्या वेळी नि:स्वार्थी असावे लागते.२३८

ठेच लागल्याशिवाय पायाखालचा रस्तासुद्धा न पाहाणारा माणूस दु:खाची ठेच लागल्याशिवाय संतमार्ग कुठला पाहाणार ? २३९

कर्ता सावध असला म्हणजे 'कर्मे' उचित होतात व 'क्रियापदेही' बरोबर चालतात.२४०

प्रार्थना व शरणागती म्हणजे दुबळेपणा वा प्रयत्न टाळण्याचा मार्ग नसून, कसून केलेल्या अनेक प्रयत्नांतला शेवटचा प्रयत्न आहे.२४१

जन्ममृत्यूने अस्तित्व सिद्ध होत नाही, ते आकार घेऊ शकते हे सिद्ध होते.२४२

वाट्याला आलेल्या दुःखाबद्दल तक्रार करणे म्हणजे माझ्या पेपरचे गुण मलाच का दिले गेले, असे म्हणण्यासारखे आहे.२४३

अहंकार म्हणजे सर्वांत मोठी बेसावधता आहे.२४४

आधी घेण्याची वेळ आल्यास, घेतलेल्यापेक्षा पुढे जास्त द्यावे आणि आधी द्यायची वेळ आल्यास, दिलेल्यापेक्षा पुढे कमी घ्यावे.२४५

आईवडिलांकडून मिळालेली देहाची शिदोरी निसर्गक्रमाने संपेल, पण जिवाने आणलेले संचिताचे ओझे मात्र आपण संपवू तरच संपेल.२४६

पूजा देवासाठी नसून भक्ताच्या पारमार्थिक प्रगतीसाठी करायची असते, याची कल्पना नसल्याने वर्षानुवर्षे पूजा करूनही अनेक भक्त 'तसेच' राहातात.२४७

खाल्लेले एकट्याला जगवते, पण पेरलेले अनेकांना जगवते, हे जाणून जगले तर त्याग व सार्थक वेगळे शिकायला नको.२४८

गुरूंना शिष्यातली गुरुमूर्ती दिसूनही त्या बाजूचा अनावश्यक भाग काढून टाकण्याच्या गुरूंच्या प्रयत्नांना सर्वच शिष्यांचे सहकार्य मिळत नाही. म्हणून काही वेळा गुरूंना अनेक गुरू घडवता येत नाहीत.२४९

सत्संगाचा उतार मिळाला, तर साधकांच्या इंजिने बंद पडलेल्या गाड्यासुद्धा वेगाने धावू लागतात, पण त्या, तो उतार असेपर्यंतच !२५०

स्वार्थाची कामे माणसाला स्वबळावर करावी लागतात, निःस्वार्थाची भगवंताच्या बळावर होतात.२५१

प्रपंचातले सुख मिरवणे म्हणजे प्रत्यक्ष बारा वाजलेले असताना आपल्या घड्याळातले काटे एकवर नेऊन, हा पहा एक वाजला म्हणण्यासारखे आहे !२५२

बरेच लोक संघर्षांतला आनंद घेतात, काही आनंदासाठी संघर्ष करतात व थोडे लोक संघर्षमुक्त होऊन खरा आनंद घेतात !२५३

अन्न शिजवून दिले, भूक दिली, घास भरवला तरी न गिळणारे शिष्य भेटले, तर गुरूच्या पदरी अपयशाशिवाय काय पडणार ?२५४

आपण सर्वच भगवंताचे आहोत, फरक एवढाच की, संतांचे ते कधी विसरत नाही आणि आमच्या ते कधी लक्षात राहात नाही !२५५

स्वार्थाच्या प्रेरणेला सावध राहावे लागत नाही, निःस्वार्थी व्हायला मात्र सावध राहावे लागते ! २५६

काही गुरू तांबडा दिवा दाखवतात, शिष्य न थांबला तर हिरवा दिवा दाखवतात. नफा-नुकसान शिष्याचेच आहे.२५७

उपलब्ध असलेला सारा वेळ शोधून तो नामाला दिला जाईल, तेव्हा ते वृत्तीपर्यंत पोचायला सुरुवात होईल.२५८

गुरूंच्या सांगण्यातले आपल्याला आवडणारे व सोयीचे पडणारे आचरणे, याला अनेक शिष्य आज्ञापालन समजतात !२५९

'भगवंत आपला' यामधून पुढे जायचे विसरल्याने 'आपण भगवंताचे' या भक्तीतल्या प्रगतीच्या पुढच्या पायरीवर अनेकांना जाता येत नाही.२६०

देखावे, क्षणिक सुखे व संकुचितता यांना सरावलेल्या प्रापंचिकांनी खऱ्या, शाश्वत आनंदमय, विशालतेच्या परमार्थाला बहुमताने नावे ठेवावी, हे परमार्थाचे प्रारब्ध आहे.२६१

दीपासारखे स्तंभावर न जाताही संत आपल्यात राहून जवळच्यांना व दूरच्यांनाही आनंदमार्गाचा प्रकाश पोचवू शकतात. २६२

निर्जीव संगणकसुद्धा कार्यरत राहायला मध्ये बंद करावा लागतो, तर उत्तम कार्यशीलतेसाठी तरी मन मधूनमधून शांत करणाऱ्या उपासनारूप विश्रांतीची सजीव माणसाला गरज आहे ना ? २६३

देवाला अभक्तांपेक्षा जास्त गंभीर प्रश्न विपरीत भक्तांचा आहे ! २६४

जगाची मदत 'नावा' पुरती
व अपुरी; देवाची मात्र 'त्याचे
नाव' हीच व पुरी !२६५

अधिकारी माणसाकडून शिकावे. सामान्य प्रापंचिकाकडून शिकणे, म्हणजे एका भ्रमलेल्याकडून दुसऱ्या भ्रमलेल्याने शहाणपण शिकण्यासारखे आहे.२६६

सख्खे माणूस नसले तरी चालेल, पण असलेल्या माणसांशी सख्य ठेवून राहायला शिकले, तरी माणसाला सोबत राहाते.२६७

खऱ्या देवद्वारी अभक्तांना नमस्कार, विषयभक्तांना बंदद्वार व भक्तांना मुक्तद्वार असते.२६८

साधनेची अखेर भगवंतापुढे आपल्याला एकटे पाडण्यात होते.२६९

काहींचे 'स्वतःचे घर' असते, काहींच्या घरात 'देव्हारा' असतो, काहींच्या 'घरात देवघर' असते आणि काहींचे 'घर देवघर' असते.२७०

अनुग्रह होणे हा पूर्वपुण्याईचा पुरावा, कृपेचा संकेत, समाधानसाधनेचा जबाबदार शुभारंभ व जीवनाच्या चिंतामुक्त वाटचालीचा दुर्लभ शुभशकुन आहे.२७१

आधी आचरून मग सांगणारे 'दुर्लभ' आणि अशांनी सांगितलेले आचरणारे त्याहून 'दुर्लभ'!२७२

गुरूंचा काय, देवाचा काय बाहेर फोटो केवढाही लावला, तरी आत फोटो केवढा उमटला आहे, ते खरे महत्त्वाचे !२७३

अक्षरशः अगणित व्यक्तींचे अंतर्जीवन सात्त्विक, विधायक घडवणे, ही संतांची कोणताही गाजावाजा न करता, निरपेक्षपणे, अविरत चाललेली, विलक्षण समाजसेवा आहे.२७४

मोकळे राहाण्यास धैर्य लागते.२७५

भेद दिसणे ही वस्तुस्थिती असली, तरी अभेद जाणणे व जमणे हे कर्तृत्व आहे.२७६

आपल्यावर आधीच असलेल्या कृपेची जाणीव जागृत ठेवणे आणि पुढे होऊ शकणाऱ्या कृपेसाठी अनुकूल घडत राहाणे, हा खऱ्या शिष्याचा गरजेचा दैनंदिन गृहपाठ आहे.२७७

लहान 'मोठे' होतात तेव्हा कौतुक आहे, पण मोठे 'लहान' होतात, तेव्हा खेद आहे.२७८

काही जिवंत मूर्ती दगडासारख्या वागतात हा प्रापंचिकांचा अनुभव असेल, तर काही दगडी मूर्ती जिवंत असल्यासारख्या वागतात, हाही भक्तांचा अनुभवच आहे, हे कळू शकेल.२७९

जगात चांगल्यावाईटाचा सीसॉ कुठल्याच बाजूला न टेकता सुरू राहाणार आहे, आपल्याला मात्र चांगल्या बाजूला बसून मुक्त व्हायचे स्वातंत्र्य आहे.२८०

'तुझे ईश्वराशिवाय चालू शकेल' याची खात्री माणसात उत्पन्न करणे, हा ईश्वरनिर्मित मायेचा महापराक्रम आहे !२८१

संगणकांच्या अचूकतेचे व कार्यक्षमतेचे कौतुक करताना दुसऱ्याला समजून घेण्याची, सांभाळून नेण्याची व प्रतिभेची माणसात व देवात असलेली क्षमता त्यांच्यात नाही, हे विसरू नये.२८२

निर्गुण पेलत नाही व सगुण भाबडेपणा वाटतो, या पेचात आपण बहुमोल देवाला गमावतो,याचे भान अनेक सुशिक्षित म्हणवणाऱ्यांनाही नसते.२८३

नदी आडवी आली तर पूल टाकील, समुद्र आड आला तर जहाज बांधील, पण प्रपंच नामाच्या आड आला तर मात्र माणूस 'योग नाही' म्हणेल ! २८४

मूर्तिपूजा हवी, कारण प्रतिक्रिया न देणारा दगडातला देव पाहायची क्षमता आली, तर पुढे प्रतिक्रिया देणारा माणसातला देव पाहाता व पचवता येईल !२८५

सृष्टीपेक्षा स्वत:ला स्वतंत्र, वेगळे व श्रेष्ठ मानणे हे मानवी अज्ञान आहे ! २८६

लोभ म्हणजे - गरजांच्या पूर्तीचे स्टेशन गाठल्यावरही, पुढे पळत राहून - अपघात करणारी गाडी होय.२८७

भगवंताच्या भांडवलावर व निरपेक्ष कर्तव्यांच्या उलाढालींवर चालला तरच प्रपंचाचा धंदा समाधानाचा नफा देऊन जातो.२८८

उपासना म्हणजे नुसती सात्त्विक कष्टांची रास रचणे नव्हे.२८९

आपण खरे तर सद्‌गुरुलीलेच्या प्रकाशात जगत असतो, हे ज्यांच्या लवकरच लक्षात येते, ते भाग्यवंत होत.२९०

ज्यांच्या विवेकपूर्ण निर्णय व कृतींत त्यांचे मन अकारण लुडबूड करीत नाही, तेच स्वतःचा व जगाचा उद्धार करू शकतील.२९१

मुक्तीसाठी दगडही धडपडत आहे, म्हणून मुक्ती हे दगडासारख्या माणसाचेही काम आहे व दगडापेक्षा श्रेष्ठ माणसाचेही !२९२

आपली परिस्थिती आजच्या अपेक्षांशी जुळत नाही म्हणून माणसाची तक्रार असते, पण ती त्याच्या कालच्या कर्मांशी जुळते, हे लक्षात आले तर तक्रार कमी होईल.२९३

उत्तम स्वास्थ्यासाठी 'आधी देऊन मग उरलेले खावे', पण किमान स्वास्थ्यासाठी 'खाऊन उरलेले तरी निदान द्यावे !'२९४

संस्कारकेंद्रे व वृद्धाश्रम ही आता अपरिहार्य झाली असली, तरी आपल्या उत्तम प्राचीन कौटुंबिक संस्कारसंस्कृतीची ती जिवंत स्मारके आहेत, हे न विसरणे बरे होईल.२९५

खऱ्या 'गुरुत्वा'स फक्त 'गुरुत्व'च असावे लागते. ते नसलेल्यांना मग वय, वक्तृत्व, सिद्धी, अभिनय, कला - असे काही मदतीस घ्यावे लागते. २९६

स्वधर्म जगणाऱ्याला जगवणे, ही भगवंताची जबाबदारी आहे व तो ती पुरी करतोच.२९७

निवृत्तीनंतर ज्ञानेश्वरी वाचू म्हणणे म्हणजे, जगून झाल्यावर कसे जगायचे ते शिकू म्हणण्यासारखे आहे.२९८

खऱ्या अनुग्रहानंतरचे साधन हे सहज व आनंदमय असते - आधीच उचललेल्या ओझ्याच्या पाटीला हात लावावा तसे !२९९

आपल्या प्रपंचाची गाडी त्याच्या खऱ्या मालकाच्या दारात लावून रोज शांतपणे आपण नामाच्या घरी मुक्कामास जावे.३००

साधक म्हणवणाऱ्या अनेकांचा साधनरंग इतका कच्चा असतो की, जरा संकटांच्या किंवा मनाविरुद्ध घटनांच्या पाण्यातून त्यांना काढले, की तो रंग उडतो.३०१

'काल-परवा-तेरवा'चे साठवायला लागले म्हणजे धोकादायक आणि चिंताजनक 'अलीकडे' तयार होतो आणि 'आज'चे ताजेपण, नावीन्य, प्रगतीच्या सर्व शक्यता आणि आनंद तो घालवतो.३०२

उपासनेत स्थैर्य व भर हा उपासनेचा पुढचा टप्पा आहे.३०३

प्रवाही व धैर्यशील राहून स्वतःचे शुद्धीकरण स्वतः करू शकणाऱ्याला बाह्य संस्कारांची आणि साधनांची विशेष गरज उरत नाही - जशी नदीला तुरटीची! इतरांनी मात्र सावध राहिलेलेच बरे!३०४

खऱ्या पारमार्थिकाने प्रगतीसाठी, निव्वळ उत्सवी परमार्थापासून दूर राहाणे त्याच्याच हिताचे आहे!३०५

मंदिरे, एका बाजूने - अनेक कारणांनी आवश्यक, पण दुसऱ्या बाजूने - माणसांच्या मनातली देवाची दुबळी ओढ आणि जगण्यातला देवत्वाचा अभाव दर्शवतात.३०६

वृक्ष वाढतो तेव्हा त्याला फांद्या फुटतात, त्यातून अधिक, स्वतंत्र, चांगले वृक्षही निर्माण होतात. त्याला 'वृक्षविस्तार' म्हणतात. वृक्षाची 'फाटाफूट' नव्हे. तीच गोष्ट गुरु-शिष्य आणि संप्रदाय यांची आहे !३०७

गुरूंनी दिलेले नाम म्हणजे जणु तयार रोप - ज्याच्या वाढीसाठी आपल्या बरोबर गुरूही पाणी घालीत असतात.३०८

अनेक साधकांची अवस्था-अडकलेल्या रुग्णासारखी असते - धड साधन वाढवीतही नाहीत आणि सोडूनही देत नाहीत! ३०९

पैशाचा संचय असतानाही तो स्वत:च्या देहसुखासाठी व चैनींसाठी खर्च करणे म्हणजे पैशाचा उत्तम, रास्त व कल्याणकारक उपयोग आपल्याला कळत नसल्याची जाहीर कबुली देणे आहे ! ३१०

नामाचे प्रमाण किती असावे - निदान प्रपंचात उनाडलेल्या वासराला परत दाव्यावर ओढून आणण्यासाठी लागणाऱ्या दोरीच्या लांबीएवढे ! ३११

मनातून 'स्वत:च्या नावा'चे आणि त्याच्या गोतावळ्याचे 'बिऱ्हाड' जोवर जागा सोडून पूर्ण जात नाही, तोवर 'भगवंताच्या नामा'ला खऱ्या अर्थाने तेथे हक्काचे 'निवासस्थान' प्राप्त होत नाही ! ३१२

मुलांची लग्ने करून दिली किंवा झाली, म्हणजे आपले मुलांचे पेपर टाकून झाले, आता फार तर अधूनमधून निकाल पाहाणे - तेही त्यांच्या पेपरचे, हे लक्षात ठेवून !३१३

कित्येकदा अडचणी आणि प्रश्न खूप सोपे वाटतात - कारण ते दुसऱ्यांचे असतात !३१४

मनाने निर्माण केलेला गोंधळ आणि ताणाचे ओझे एकट्याला उचलत नाहीसे झाले, म्हणजे तरी निदान, मनोविकारांना सामोरे जाण्यापेक्षा, आपण होऊन ओझे उचलायला तयार असलेल्या भगवंताची उपासनेने मदत घ्यावी.३१५

'मी' चे बीज दोन प्रकारे नष्ट करता येते - भगवंताच्या भूमीत पेरून, शुद्धतेचे पाणी घालून, विधायकपणे वृक्ष होण्याने किंवा त्याचे खरे स्वरूप जाणण्याच्या अग्नीत भाजून, ते उगवण्याची क्षमता नष्ट करण्याने !३१६

पाश्चात्य संस्कृतीने देहबाधित, भोगग्रस्त, मालिकाग्रस्त आणि अंधानुकरणप्रिय पिढ्या आपल्याकडे घडविल्या, याचे आकलन आणि त्यावर योग्य उपाय झाले, तर येथे शांतिमय, स्वावलंबी, समाधानी जीवनाला आरंभ होईल.३१७

प्रापंचिक सुरक्षिततेची गरज म्हणून भिंतींचे घर बांधताना ईशकृपेचे वारे खेळायला स्मरणाच्या खिडक्या आणि मुक्त होण्यासाठी दार ठेवून ज्याने घर बांधले, त्याने प्रपंच साधला!३१८

सगळ्या भातुकल्याच चालल्या आहेत - मोठ्यांच्या प्रसिद्धी-पगार-घरेदारे-प्रतिष्ठा देणाऱ्या आणि लहानांच्या खेळाच्या आनंदापेक्षा काहीच न देणाऱ्या - हे कळले तर लहानांना ताण नसतोच, पण मग मोठ्यांनाही तो ताण यायचे कारण नाही.३१९

मनापासून, आवडीने, आपण होऊन, प्रपंचाच्या बंधनात पडलेल्या व तेथेच आनंद वाटणाऱ्या, जिवाला परमार्थाची गोडी लावून खऱ्या दु:खद असलेल्या प्रपंचातून सोडवणे, हीच परमार्थाची खरी समस्या आहे ! ३२०

'जनी वंद्य ते 'सर्व'भावे करावे का?' हा प्रश्न आता सध्याची बाह्य परिस्थिती पाहाता कळकळीने खुद्द श्री समर्थांनाच विचारण्यासारखा प्रश्न झाला आहे!३२१

निर्माल्य टाकताना, देव न टाकण्याची सावधानता असणाऱ्याला, बिनगरजेची अंधश्रद्धा त्यागताना गरजेची श्रद्धा जपणे कळू शकेल ! ३२२

पूर्वी तपोभंगासाठी अप्सरा पाठवीत असे म्हणतात.आजच्या युगात सदाचरणासारखी कुठलीही तपश्चर्या करणाऱ्यांसाठी एकच अप्सरा पाठवतात, तिचे नाव - पैसा ! ३२३

निर्गुणाच्या घरातले सगुण हे सर्वांत लहान बाळ आहे. आपल्या घरी कुणी आल्यावर तिथल्या लहान बाळाच्या नावाने हाक मारतात, तेव्हा घरातले कुणीही मोठे ओ देते! दार उघडते! तेच काम सगुण करते! ३२४

घर बांधायला दगड लागतात, पण म्हणून घर बांधल्यावर कुणी दारात दगडांची रास रचून ठेवीत नाहीत. तेच खऱ्या गरजा संपल्यावरच्या पैशाचे आहे ! ३२५

भगवंताचा काय, गुरूंचा काय पहिला कुठलाही छोटासा अनुभवसुद्धा विसरू नये, सोडू नये. कारण त्याच अनुभवाच्या बीजाला पुढच्या छोट्या-मोठ्या अनुभवांचे अंकुर येतात आणि बाग फुलते.३२६

खरा आधार भगवंताचा - कारण तो नियामक आहे, पण स्वतः नियमबद्ध नाही.नियमातीत आहे,पण नियमबाह्य नाही! ३२७

बऱ्याच जणांना मरणाआधी एक मृत्यू असतो याची कल्पनाच येत नाही. म्हणून संतजीवन कळत नाही आणि त्यात नांदणारा परमानंदही कळत नाही.३२८

आपल्या मानवी बुद्धीने साध्या, खऱ्या दृश्याचा पुरता उलगडा होत नाही, तर त्याच बुद्धीने अदृश्याचा उलगडा करीन म्हणणे म्हणजे बुद्धिमंतांचा बालिशपणा आहे !३२९

अनेक देवांसमोर, समाध्यांसमोर भक्तांच्या प्रचंड रांगा लागतात. त्या रांगा त्यांच्या 'खऱ्या भक्तां'च्या असत्या तर किती बरे झाले असते !३३०

गुरू जे जे देतात आणि जे जे देत नाहीत त्यांतली त्यांची कल्याणबुद्धी जाणून दोन्हींतही आनंदाने जगतो तो खरा शिष्य! ३३१

ईश्वरदत्त विलक्षण बुद्धी केवळ स्वार्थाच्या पूर्तीसाठी वापरणे ही ईश्वराची फसवणूक आहे. ती बुद्धी थोडीतरी त्याच्या शोधासाठी व प्राप्तीसाठी वापरावी.३३२

आज्ञा विचारणाऱ्या आणि तरीही त्या न पाळणाऱ्या शिष्यांना सद्‌बुद्धीने आज्ञा देत राहाणे,हा खऱ्या गुरूच्या प्रारब्धातील 'निष्काम कर्मयोग' आहे.३३३

देहाचा मृत्यू म्हणजे 'सर्व संपून'-'मुक्ती' - हे जर एवढे सोपे असते तर हत्या आणि आत्महत्या - हे मुक्तीचे सोपे राजमार्ग ठरले असते. ३३४

'घर' बांधणे आणि त्यात राहाणे हे कर्तव्याचे काम असले तरी, त्यालाच 'जग' समजले तर, तोच तुरुंग ठरून मुक्तीच्या आड येऊ शकतो.३३५

कपाटे भरून ग्रंथ घरात बाळगणे काय आणि पाठ करून डोक्यात बाळगणे काय - उपयोगात व आचरणात येत नसेल तर, दोन्ही देखावे व ओझीच आहेत. ३३६

भाग्याची जाणीव होणे हे सर्वांत मोठे भाग्य आहे. मनुष्यत्वाच्या भाग्याबद्दल माणसाचे तेच आहे.३३७

हातात ग्रंथ उचलण्याचेही बळ नसण्याच्या, शब्द वाचण्याची साधी दृष्टीही दुबळी होण्याच्या आणि श्रवणासाठी कानांना ऐकू येऊ न लागण्याच्या-वृद्धापकाळात ज्ञानेश्वरी वाचण्याचे संकल्प करणाऱ्या 'तरुणां'च्या दूरदृष्टीचे साक्षात माउलींनाही 'करुणकौतुक' वाटत असेल ! ३३८

नमस्कारात 'नमन'असेलच असे नाही, पण 'न-मना'त मात्र नमस्कार आहे - प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष आणि सर्वांनाही !३३९

सगुण माना वा न माना, पण सगुणाचा अनादर हा निर्गुणाचा अवमान आहे. ३४०

आधीची 'अर्जुनावस्था' आपली असते, पण पुढची त्याची निःसंदेह, कर्तव्यावस्था आपल्याला यावी, म्हणून गीता अभ्यासावी. ३४१

ज्यांनी तरुणपणीच जीवनाचे कोडे सोडवले नाही, त्यांना म्हातारपणी त्याच त्याच जुन्या आठवणी काढीत, इतरांच्या प्रपंचात लुडबुडी करीत, नाहीतर शब्दकोडी सोडवीत वेळ काढावा लागतो ! ३४२

आंब्याला फणस येण्याची अपेक्षा आपण चुकीची समजतो, पण आपल्या अविचारी, बेसावध, चुकीच्या कर्मांना मात्र सुखसमाधानाची फळे येण्याची अपेक्षा बरोबर मानतो, हा विरोधाभास आपल्याला कधी कळेल तो सुदिन! ३४३

सद्गुरूंच्या उपदेशाने स्वतःचे हित स्वतःला कळत गेले आणि तशा कृती वाढू लागल्या म्हणजे गुरूंचा आनंद खरा वाढतो. हे कळले तरी नुसते गुरूंचे काकडे, पाद्यपूजा, आरत्या, शेजारत्या, स्तुती, दर्शने - यांचे त्यापुढे मूल्य किती कमी आहे, हे कळते. ३४४

जगातल्या नश्वरतेची आणि स्वार्थी संबंधांची नीट कल्पना माणसाला येत नाही आणि आली तरी ती टिकत नाही, म्हणून! नाहीतर माणसाला शाश्वत व आनंदाचा परमार्थ कर म्हणून सांगावेच लागणार नाही ! ३४५

माणसांची बुद्धी जितकी बोथट, ढोबळ आणि देहनिष्ठ तितक्या त्यांच्या करमणुकीच्या कल्पनाही ढोबळ व उथळ असतात.३४६

भेदबुद्धी वाढायला लागली की, प्रपंच चांगला जमायला लागला आणि भेद मावळायला लागले की, परमार्थ मुरायला लागला !३४७

साद नसतानाही प्रतिसाद ही केवळ भगवंताची कृपा व करुणा आहे आणि ती अनुभवायला येऊ शकते ! ३४८

बहुतेकांना आपला फोटो चांगलाच देणारे फोटोग्राफर आवडतात. म्हणून खरी साधना, खरे संत आणि खरा परमार्थ येथे फारशी गर्दी नसते.३४९

जग रंगभूमी आहे कळते, पण आपले जीवनही त्यावरचे अल्पकाळचे नाटकच आहे, असे समजून राहाता येत नाही, म्हणून सुखदुःखे भोगावी लागतात.३५०

नाम हे साधकाचे असे शस्त्र आहे, जे त्याच्या मुक्तीच्या मार्गातल्या सूक्ष्मात सूक्ष्म शत्रूचा पराभव करीपर्यंत लढते आणि विजय मिळताच 'शस्त्र' म्हणून अंतर्धान पावते.३५१

असलेले प्रारब्ध शांतपणे सहन करणे आणि नवे निर्माण होऊ नये यासाठी योग्य कृती करणे - या दोन्हींहीसाठी खऱ्या भक्तीचा उपयोग होतो.३५२

एक वेळ गीता ऐकणाऱ्या किंवा ऐकावी लागणाऱ्या धृतराष्ट्रांची कमी नाही, पण आचरणाऱ्या अर्जुनांची वानवा आहे, म्हणून स्वधर्माचरण सार्वत्रिकपणे दिसत नाही.३५३

परमार्थाच्या 'अ,आ,इ,ई'त अनुग्रहातला अकार गिरवला, की आस्था, आज्ञापालन व आचरण यातला 'आ'कार गिरवावा लागतो. अन्यथा इष्टप्राप्तीतली 'इ' आणि ईश्वरातली 'ई' दूर राहते.३५४

उत्तम प्रवचने ऐकल्यावर (‘सेव्ह’) ‘मेंदूत जपून ठेवावे’ हे बटण दाबायचेच कित्येक श्रोत्यांचे राहून जाते. त्यामुळे अनेक चांगली प्रवचने ऐकूनसुद्धा आठवतही नाहीत, उपयोगीही पडत नाहीत. ३५५

गुरूंना साधनेची व आचरणाची ‘आश्वासने’ देणारेच जास्त, ‘शब्द’ देणारे कमी ! ३५६

भगवंताच्या कृपेने मनुष्यदेहाच्या नौकेच्या साधनात बसलोच आहोत तेव्हा खरे पैलतीर लक्षात ठेवून प्रवास करू या म्हणजे झाले! ३५७

सध्याच्या कर्मांची संधी हा आधीच्या चुकीच्या आणि म्हणून टोचणाऱ्या कर्मांचा काटा काढायला मिळालेला काटा आहे, हे ओळखून काम केले तर लवकर प्रगती होईल! ३५८

जे आहे हे कळते पण सिद्ध करता येत नाही, ते 'मानणे' ही अंधश्रद्धा नसून, ते कळेपर्यंत दाखवलेले 'समजूतदार मानवी तारतम्य' आहे !३५९

आधी प्रापंचिकता ही वस्तुस्थिती व परमार्थ हा अभिनय, पण पुढे पारमार्थिकता ही वस्तुस्थिती आणि प्रपंच हा अभिनय होणे ही साधनेतली प्रगती आहे !३६०

मला खरोखरच बिनगरजेचे काही नको असेल तर गरजेचे सर्व भगवंतच पुरवीत असतो - ही धारणा स्वीकारील तर अखिल मानव सुखी राहील.३६१

सदनिका संस्कृती अपरिहार्यतेतून आली. तिने खासगी जीवनाचे कौतुकही आणले. पण सदनिकांना असलेली माणुसकीची दारे कायम बंद ठेवणेही आणले. यांतले नुकसान आता हळूहळू लक्षात येऊ लागले आहे.३६२

जे ज्ञान त्याबरोबर उरलेल्या विशाल ज्ञानाच्या अज्ञानाची जाणीव निर्माण करीत नाही, ते ज्ञान अहंभाव देते आणि पुढच्या प्रगतीच्या वाटाही बंद करते.३६३

संकटे, परिस्थिती, माणसे यांना सामोरे न जाता, त्यांपासून दूर पळण्याचे प्रयत्न म्हणजे, आपल्याच शर्टाच्या खिशात ठेवलेल्या वस्तूंपासून दूर जाण्यासाठी, तोच शर्ट घालून दूरवर फिरून किंवा गावाला जाऊन येण्यासारखे आहे.३६४

शिष्यच जेव्हा मुक्ती हे अनेक जन्मांचे काम आहे असे ठरवतात, तेव्हा याच जन्मी मुक्ती देणारा सद्गुरूही हतबल होतो. ३६५

खरे शिष्यत्व सांभाळणे ही गुरुमार्गीची श्रेष्ठ, खडतर पण अत्यंत आनंददायी साधना आहे ! ३६६

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

डॉ. सुहास पेठे यांची ही बोधवचने म्हणजे शुद्ध परमार्थमार्गावरील अभ्यासू व्यक्तींना चिंतनाची एक पर्वणीच होय. कारण या वचनांमागे डॉ. पेठे यांचे तीन तपांचे मूलगामी चिंतन, स्वानुभव, अभ्यास, प्रयोग अशी विस्तृत पार्श्वभूमी आहे. शुद्ध परमार्थाचे आकलन व आचरण यासाठी त्यांची ही वचने आमच्याप्रमाणे इतरांनाही उपयोगी ठरतील म्हणून संकलित व प्रकाशित होत आहेत.

चिंतनक्षण